# प्रेरा नोट दिनांक २८/०२/२०२५

**राज्य शारानाचा उत्कृष्ट पोलीरा उप-आयुक्त - "बालस्नेही पुररकार २०२४" डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) व वरिष्ठ पोलीरा निरीक्षक महादेव राऊत, यांना उत्कृष्ट पोलीस निरीक्षक - बालस्नेही पुरस्कार २०२४ यांना जाहीर.**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे आयोजित "बालस्नेही पुरस्कार २०२४" या पुरस्काराकरिता डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), सोलापूर शहर यांना उत्कृष्ट पोलीस उप-आयुक्त म्हणून जाहीर झाला आहे. तसेच श्री.महादेव राऊत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, सोलापूर शहर यांना "बालस्नेही पुरस्कार २०२४" उत्कृष्ट पोलीस निरीक्षक या प्रकारात गुन्हे शाखा, सोलापूर शहर विभागातून जाहीर झाला आहे.

मा.श्री.एम.राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या नेतृत्वाखाली बालकांच्या संरक्षणार्थ केलेल्या कारवाईबद्दल महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासन यांनी दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर केला आहे.

सदर पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सेंटर, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१ येथे दिनांक ०३/०३/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वा. मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री.अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा.ना.कु.आदिती तटकरे, मंत्री, महिला व बाल विकास विभाग, मा.ना.श्री.योगेश कदम, राज्यमंत्री, गृह(शहर), मा.ना.श्रीमती मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

( डॉ.दीपाली काळे )
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा)
सोलापूर शहर.